Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१३/२०२३

**विषय - वर्ग-३ मधील प्रशासकीय सेवक यांचे कार्यशाळेबाबत**

सर्व अधिविभागप्रमुख, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना आदेशान्वये कळविणेत येते की, शिवाजी विद्यापीठातील ॲकॅडमी फॉर ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेशन यांच्या वतीने दि. ०९/०५/२०२३ व दि. १०/०५/२०२३ रोजी कार्यालयातील प्रशासकीय कामकाजाबाबत माहिती, मार्गदर्शन व कार्यालयीन कामकाज प्रभावीपणे होणेच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठातील नियमित सेवेतील सर्व वर्ग-३ मधील सेवकांकरिता विद्यापीठ कार्यालयातील मानव्यशास्त्र सभागृह येथे सकाळी १०.३० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत **एक दिवसीय कार्यशाळेचे** आयोजन करण्यात आले आहे.

तरी सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदर कार्यशाळेकरिता आपल्या विभागात कार्यरत असणाऱ्या वर्ग-३ मधील एकूण सेवकांपैकी दि. ०९/०५/२०२३ रोजी ५०% व दि. १०/०५/२०२३ रोजी उर्वरीत ५०% सेवकांना सदर कार्यशाळेसाठी उपस्थित रहाणेची सुचना दयावी. सदरच्या एक दिवशीस कार्यशाळेस उपस्थित रहाणे सर्व नियमित वर्ग-३ सेवकांना बंधनकारक आहे. तसेच, कार्यशाळेस उपस्थित राहणाऱ्या नियमित सेवकांनी कार्यशाळेच्या ठिकाणी सकाळी १०.१५ वाजता नावनोंदणी करणे आवश्यक आहे. सदर कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या सेवकांकरीता कार्यशाळेच्या ठिकाणी चहा, नाष्टा व भोजनाची सोय करण्यात आली आहे. याची नोंद घ्यावी.

प्र. कुलसचिव

**जा. क्र. आस्थापना/** 852

**दिनांक :-** 06 MAY 2023

**प्रति,**

**संबधित अधिकारी/सेवक**

**प्रत -**

१ .सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, चिफ रेक्टर व रोक्टर सर्व वसतिगृहे, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

२. मा.कुलगुरु,मा.प्र-कुलगुरु,मा.कुलसचिव,मा.संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

➢ **विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.**